क्रमांक:-जमीन २६९८/३५०
प्र.क्र. ... /ज-१
महसूल व वन विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक- ८.७.२००५

विषय :- जमीन - मुंबई उपनगर जिल्हा
मौजे आणिक येथील स.नं. १९०, न.भू.क्र. २३० व
मधील जमीन भारत पेट्रोलियम कार्पोरेशन
यांना वाहनतळासाठी ( ट्रक टर्मीनस ) मंजूर करणेबाबत.

**शासन :-**

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना वरील विषयासंबंधीच्या त्यांचे क्रमांक-सी/कार्या- २ बी /जे ३०० , दिनांक ९.७.२००० च्या पत्रास अनुलक्षून विज्ञापितपूर्वक असे कळविण्याचे मला निदेश आहेत की, भारत पेट्रोलियम कार्पोरेशन यांना वाहनतळासाठी ( ट्रक टर्मीनस ) मौजे चेंबूर - आणिक येथील स.नं. १९०, न.भू.क्र. २३० व मधील ८०८३४ चौ.मी. ( ८ हेक्टर ) जमीन महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीचे वितरण) नियम, १९७१ मधील नियम ३५ अन्वये प्रस्तावित जमिनीची सहाय्यक संचालक नगररचना व मूल्य निर्धारण विभाग यांजकडून निर्धारित केल्या जाणाऱ्या प्रचलित बाजारभावाच्या एकूण किंमतीवर भारतीय स्टेट बँकेच्या प्रत्येक वर्षाच्या १ जानेवारी रोजी अस्तित्वात असणाऱ्या प्राईम लेंडींग रेटप्रमाणे होणाऱ्या व्याजाच्या रकमेइतके भोगवटा भाडे आकारून ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने देण्याच्या अटी व शर्तीवर तसेच याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना योग्य वाटतील अशा अन्य अटींवर देण्यास या अपवादात्मक शासन मंजूरी देत आहे.

२. हे आदेश नगर विकास विभाग, गृहनिर्माण विभाग आणि वित्त विभागाच्या सहमतीने (वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्रमांक -५०५ / ०४ व्यय -९, दिनांक-२५.५.२००४ ) निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(चारुशीला तांबेकर)
अवर सचिव
महसूल व वन विभाग

WS- 877
13/7/05

प्रति,
जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा,
प्रशासकीय इमारत,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१

जिल्हाधिकारी कार्यालय
7 JUL 2005
14468



Scanned by CamScanner

प्रतिलिपी :-

१) आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.

२) उपसंचालक, भूमी अभिलेख, कोकण विभाग, मुंबई.

३) महालेखापाल १/२ ,महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.

४) महालेखापाल १/२ ,महाराष्ट्र राज्य मुंबई/नागपूर(लेखा व अनुज्ञेयता)

५) सहाय्यक संचालक, नगर रचना व मुल्यनिर्धारण, मुंबई

६) नगर विकास विभाग ,मंत्रालय ,मुंबई-३२.

७) गृह विभाग, ,मंत्रालय ,मुंबई-३२.

८) वित्त विभाग, (व्यय -१) मंत्रालय, मुंबई - ३२

९) निवडनस्ती, ज-३ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२

Scanned by CamScanner

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, बांद्रा (पू) मुंबई-५१
Ph.6556799, 6550111
Fax : 6556805
email address:- collrmsd@yahoo.com

(१९)

क्र. :-मी/कार्या ३ डी/एल - ६.३२
दिनांक :2 7 DEC 2005

**वाचले :-** १) शासन महसूल व वन विभाग ज्ञापन क्रमांक जमिन २६१८/३५०/प्र.क्र.२७५१/ज. ३ दि. ४ /७/ २००५

**आदेश :-**

भारत पेट्रोलियम कार्पोरेशन यांना वाहन तळासाठी (ट्रक टर्मिनस ) मौजे चेंबूर आणिक येथील स.नं. १९२ नभू.क्र. २३० ब मधील ८०६३६.० चौ. मी. (८ हेक्टर) जमिन महाराष्ट्र जमिन महसुल (सरकारी जमिनीचे वितरण) नियम १९७१ मधील नियम ३५ अन्वये प्रस्तावित जमिनीची सहाय्यक संचालक नगर रचना व मुल्य निर्धारण विभाग यांजकडून निर्धारित केल्या जाणाऱ्या प्रचलित बाजारभावाच्या एकूण किंमतीवर भारतीय स्टेट बँकेच्या प्रत्येक वर्षाच्या १ जानेवारी रोजी अस्तित्वात प्राईम रेडीग रेटप्रमाणे होणाऱ्या व्याजाच्या रकमेइतके प्रतिवर्षी भाडे आकारुन ३० वर्षांच्या भाडेपट्टयाने नेहमीच्या अटी/शर्तीवर तसेच जिल्हाधिकाऱ्यांना योग्य वाटतील अशा अन्य अटीवर देण्यास शासनाने उद्देशांकित अनुक्रम १ वर नमुद असलेल्या ज्ञापनान्वये मंजूरी दिली आहे. शासन महसूल व वन विभाग यांच्या उक्त दि. ४/७/२००५ रोजीच्या ज्ञापनाच्या आधीन राहून मौजे आणिक येथील स.नं. १९२ न.भू.क्र. २३० ब मधील ८०६३६.० चौ. मी. (९ हेक्टर) जमिन महाराष्ट्र (सरकारी जमीनीचे वितरण) नियम १९७१ मधील नियम ३५ अन्वये जमिनीची प्रचलित बाजारभावानुसार येणाऱ्या किंमतीवर प्राईम लेंडींग रेट प्रमाणे प्रतिवर्षी भाडे आकारुन ३० वर्षांच्या भाडेपट्टयाने भारत पेट्रोलियम कॉपोरेशन यांना वाहन तळासाठी या कार्यालयाची मंजूरी खलील अटी व शर्तीवर देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती**

१) सहाय्यक संचालक नगर रचना व मुल्य निर्धारण विभाग यांजकडून अंतिम मुल्यांकन प्राप्त होणेचे आहे. सबब सन २००५ रोजीचे शिघ्र सिध्द गणनानुसार जागेचे बाजार भाव रु. ७३००/- प्र. चौ. मी. या तात्पुरत्या दराने जमिनीचे बाजार मुल्य रु. ५८,८६,४२,८००/- इतके होत असून प्राईम लेडींग रेट १०.२५ प्रमाणे वार्षिक भाडेपट्टयाची रक्कम रु.६,०३,३५,८८७/- इतकी होत आहे. हा आदेश प्राप्त झाल्यापासून १० दिवसांत COLLECTOR SUBURBAN DISTRICT यांचे नावे धनादेश पे ऑर्डर काढून या कार्यालयात जमा करावा.

२) मंजूर जमीनीची आजच्या बाजारभावाची किंमत सहाय्यक संचालक नगर रचना व मुल्य निर्धारण विभाग यांचेकडून निर्धारीत करुन घेतल्यानंतर तात्पुरत्या किंमतीपेक्षा अंतिम किंमत अधिक असल्यास फरकाची रक्कम प्रचलित व्याजदराने व्याजासह शासन /जिल्हाधिकारी यांचेकडे पट्टेदारास भरणा करावी लागेल.

Scanned by CamScanner

३) पट्टेदार यांना जमिन ज्या प्रयोजनार्थ मंजूर करण्यात आली आहे. त्याच प्रयोजनासाठी जमिनीचा वापर करावा लागेल वापरात बदल करावयाचा असल्यास शासन /जिल्हाधिकारी यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील.

४) शासन /जिल्हाधिकारी यांच्या पूर्व परवानगी शिवाय कोणालाही जमीन किंवा तिचा कोणताही भाग किंवा तिच्यावरील कोणतेही हितसंबंध हस्तांतरीत करता येणार नाहीत.

५) वाहन तळ (ट्रक टर्मिनस) करिता मुंबई महानगर पालिका व इतर सक्षम प्राधिकरण यांची पूर्व परवानगी आवश्यक आहे.

६) सदर जमिन शासनाचे अंतिम मुद्दयांचे अधिन राहून मंजूर करणेत येत आहे. शासनाने भविष्यात मंजूरी नाकारल्यास जमिन विना मोबदला पुर्नग्रहीत करणेत येईल किंवा शासन ठरविल त्या अतिरिक्त अटि व शर्ती पट्टेदारास बंधनकारक राहतील

७) प्रस्नाधिन जमीन पट्टेदार भोगवटादार वर्ग २ म्हणून धारण करतील.

८) भाडेपट्टयाची मुदत संपल्यापूर्वी ३ महिने अगोदर पट्टेदाराने त्याची इच्छा असल्यास नवीकरण करण्याबाबत लेखी अर्ज जिल्हाधिकाऱ्यांकडे केला पाहिजे. पट्टेदाराने नवीकरणाबाबत लेखी अर्ज न केल्यास भाडेपट्टयाची मुदत संपल्यानंतर त्यास नवीकरणाची आवश्यकता नाही असे गृहित धरुन भाडेपट्टासंपुष्टात आणला जाईल.

९) प्रती १० वर्षांनी भाडेपट्टयाचे दराचे पुर्नविलोकन (सुधारीत) करण्यांत येईल त्यानुसार होणारी भाडेपट्टयाची रक्कम भरणे पट्टेदारास बंधनकारक राहील.

१०) सदर जागेवरुन टाटा पॉवर लाईन गेली असल्याने वाहनतळावर लोडेड ट्रक पार्क करता येणार नाहीत फक्त रिकामे ट्रक उभे करता येतील.

११) पट्टेदार यांनी जागेचा ताबा घेतल्यापासून एका वर्षात जमिनीचा वापर सुरु करावा.

१२) शासन/जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेल्या शासकीय अधिकारी /कर्मचारी यांना केव्हाही जमिनीच्या उक्त भागात प्रवेश करुन निरीक्षण करण्यास परवानगी देणे पट्टेदारास बंधनकारक राहील.

१३) मंजूर जमीनीव्यतिरिक्त सरकारी जमीनीतून ती वर किंवा ती खालून पाण्याचे प्रमुख नळ, नळ पाईप घालणेस शासन /जिल्हाधिकारी यांची परवानगी घेणे पट्टेदारास बंधनकारक राहील.

१४) जमिनीखालील गौण व खनिजाचे हक्क शासनाचे राहतील.

१५) प्रति १०० चौ. मी. ला एक या प्रमाणे झाडे लावणे व त्याची जोपासना करणे पट्टेदारास बंधनकारक राहील.

१६) पट्टेदार यांनी प्रतिवर्षी भाडेपट्टयाची रक्कम १ ऑगस्ट रोजी भरणा करावी.

१७) भाडेपट्टयाची गणना करणेस कोणतीही चूक झाल्याचे अथवा कमी आकारणी केल्याचे निदर्शनास आल्यास त्याप्रमाणे भाडेपट्टयाची सुधारीत आकारणी करणेत येईल.

Scanned by CamScanner

१८) पट्टेदार यांना शासनाबरोबर करारनामा करावा लागेल व त्यासाठी होणारी शासकिय फि भरणे व करारनामा नोंदणीकृत करुन घेणे पट्टेदारास बंधनकारक राहिल.

१९) उक्त अधिनियमाचे उपबंध व त्यावेळी अंमलात असणारे सर्व नियम व आदेश त्यांचे उपबंध जेथवर लागू असतील तेथवर ते उक्त जमिनीच्या भोगवटयास लागू असतील

२०) वरील अटी व शर्ती व्यतिरिक्त शासन जिल्हाधिकारी ठरवितील त्या अतिरिक्त अटी व शर्ती पट्टेदारास वरील बंधनकारक राहतील.

२१) हया पट्टयाच्या शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचा भंग झाल्याच्या बाबतीत, पट्टेदार अधिनियमात व त्या अन्वये नियमात तरतुद केल्याप्रमाणे शास्तिस पात्र राहतील.

२२) उपरोक्त अटी/शर्ती मान्य असलयाबाबतचे हमीपत्र रु. १००/- चे मुद्रांकीत पेपरवर सादर करावे.

आपला विश्वासू,

(सही)

जिल्हाधिकारी,

मुंबई उपनगर जिल्हाकरीता.

प्रति,

मे. भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकार का उपक्रम) भारत भवन ४ व ५,
करिमभॉय रोड, बेलार्ड इस्टेट, मुंबई- ४०० ०७१

प्रत : १) मा. प्रधान सचिव (महसूल) महसूल व वन विभाग, मंत्रालय यांजकडे शासन ज्ञापन क्र. जमिन २६९८/३५०/प्र.क्र.२७५९/ज ३ दि. ४/७/२००५ अन्वये माहितीकरिता सविनय सादर

२) मा. विभागिय आयुक्त कोकण विभाग कोकण भवन नवि मुंबई यांजकडे माहितीकरिता सविनय सादर

३) प्रत : सहाय्यक संचालक नगर रचना व मुल्य निर्धारण विभाग मुंबई, जुने जकात घर फोर्ट मुंबई ४०० ०२३ यांजकडे माहीती व पुढील कार्यवाही करिता रवाना.

२/- त्यांनी शासन महसूल व वन विभागाचे दि. ४/७/२००५ रोजीचे ज्ञापनाचे अवलोकन करावे.

३/- प्रस्तुतचे प्रकरणी प्रश्नांकीत जागेचे मुलयांकन करुन या कार्यालयास जागेचा आजचा बाजारभाव कळवावा.

४) तहसिलदार कुर्ला/नगर भूमापन अधिकारी चेंबूर यांजकडे माहीती व पुढील कार्यवाहीकरिता रवाना.

२/-पट्टेदार यांनी जागेचा वार्षिक भाडेपट्टयाची रक्कम आगाऊ शासन तिजोरीत जमा केली आहे काय तसेच हमीपत्र सादर केले आहे काय याची आवश्यक ती खात्री करुन जमिनीचा रितसर ताबा संबंधित पट्टेदारास तहसिलदार कुर्ला यांचे समक्ष देवून ताबा पावती व नकाशाच्या तीन प्रतीसह या कार्यालयास अहवाल सादर करावा.

ISSued 28/11/07

(सही)

जिल्हाधिकारी,

मुंबई उपनगर जिल्हाकरीता.

Scanned by CamScanner